# जागतिकीकरणाचे शिक्षणावरील परिणाम

प्रा.एस.पी.वेल्हाळ गोगटे-वाळके कॉलेज, बांदा ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग

---

**प्रास्ताविक:-**जागतिकीकरण ही एक बहुआयामी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेमुळे शिक्षणव्यवस्थेवर आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक परिणाम पडून येत असल्याचे दिसत आहेत. यामुळेच उच्च शिक्षणात खाजगी संस्था स्थापन होत आहेत. उच्च शिक्षणाची संधी, समान न्याय, वित्तप्रबंध व गुणवत्ता यासंबंधी आव्हाने उभी राहिली आहेत. याशिवाय राष्ट्राचे सार्वभौमत्व, सांस्कृतिक वैविध्य, दारिद्रय व टिकावू विकासाचे प्रश्नही निर्माण होत आहेत.युनोस्कोच्या २००३ च्या अहवालामध्ये असे म्हटले आहे की, शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे शिक्षण या सेवाक्षेत्राचा वापर बाजारतंत्राप्रमाणे होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यामुळे शासनाचे उच्चशिक्षणावरील नियंत्रण कमी झाले आहे. त्यामुळे दुर्बल घटक व गरीब यांच्यावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता वाटते.१९९० नंतर भारतात उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण या नावाखाली सरकार जागतिक बँकेच्या दडपणाखाली उच्च शिक्षणाचे धोरण ठरवित आहे. उच्च शिक्षणाच्या व्यापारीकरणाला सरकारचे आर्थिक सामाजिक धोरण सत्ताधा-यांची सांप्रदायिक बांधिलकी न्यायव्यवस्थेची कृतिप्रधान भूमिका आणि व्यावसायिक क्षेत्रांचे हितसंबंध ही महत्वाची कारणे आहेत.

**अभ्यासाचे गृहीतक**

१) देशाच्या विकासात शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे.
२) जागतिकीकरणाचा शिक्षणावर परिणाम घडुन आला आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टये**

१) भारतीय शिक्षणाची सद्यस्थिती अभ्यासणे
२) भारतीय शिक्षणपध्दतीवरील जागतिकीकरणाचा परिणाम अभ्यासणे
३) भारतीय शिक्षणाचा दर्जा अभ्यासणे
४) भारतीय शिक्षणव्यवस्थेवरील समस्यांचा अभ्यास करणे.

**शोधनिबंधाची अभ्यास पध्दती:** प्रस्तुत शोधनिबंध हा दुय्यम माहितीवर आधारित आहे. दुय्यम सामुग्रीमध्ये विविध वर्तमानपत्रातील लेख, मासिके, पुस्तके, इंटरनेट, इ. चा माहिती संकलित करण्याकरिता आधार घेतला आहे.

**जागतिकीकरणाची संकल्पना :-**जागतिकीकरण म्हणजे आपल्या क्षेत्राच्या भौगोलिक क्षेत्रापलिकडे उत्पादन आणि वितरण यांचा विकास आणि विस्तार होण्याची प्रक्रिया होय. या अंतर्गत भांडवल, वस्तू, उद्योजक व्यावसायिक व मनुष्यबळ यांचा जगभर मुक्तसंचार घडून येतो. राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचे जागतिक अर्थव्यवस्थेत परिवर्तन होण्याची प्रक्रिया म्हणजेच जागतिकरण होय. थोडक्यात आपल्या देशाच्या भौगोलिक मर्यादेच्या बाहेर आर्थिक राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक संबंध प्रस्तापित करणे व ते टिकविण्याच्या प्रक्रियेला जागतिकीकरण म्हणता येईल. १९७१ मध्ये चीनने बाजारव्यवस्थेचा स्वीकार केला १९९१ मध्ये सोव्हिएट रशियाचे पतन झाले. १९९१-९२ मध्ये भारताने मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला व १९९४ मध्ये अमेरिकेने व्यापारनिर्बंधाची दिलेली धमकी या व अशी ४०-५० वर्षाच्या काळातील आर्थिक व राजकीय घडामोडीतून जागतिकीकरणाची प्रक्रिया रुढ झाली आहे. दुस-या महायुध्दानंतर संगणकीय क्रांतीने झालेल्या अमर्याद उत्पादनामुळे ते उत्पादन जगात जिथे जास्त किंमत मिळेल त्या बाजारात विना अटकाव शिरता आले पाहिजे. म्हणून भांडवलशाही देशांनी आर्थिक व्यवस्थेचे नवे प्रतिमान आणले ते खुली व्यापार व्यवस्था व जागतिक मुक्त व्यापार करार यातून सफल झाले आहे. जागतिकरणाच्या प्रक्रियेचे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, मानसिक, तंत्रज्ञानविषयक, भाषाविषयक, महिलाविषयक इ. बरेच आयाम आहेत. या सर्व आयामांचा गाभा अनिर्बंध स्वात्यंत्र्याचा आहे.आजच्या जगात सर्वात प्रकर्षानेप्रकटहोणाराआयामम्हणजेशिक्षणाचेबाजारीकरणहोय.

**जागतिकीकरणाचा शिक्षणावरील परिणाम -**जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरु होण्यापूर्वी भारतात शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टीकोन उदात्त होता. तळागाळातील समाजाचा विकास व्हावा ही शिक्षणाची भूमिका होती. शिक्षणविषयक आयोगाचे धोरणही असेच होते. नंतरच्या काळात कल्याणकारी भूमिकेला अपयश आले. दिवसेंदिवस ढासळत चाललेल्या भारतीय अर्थव्यवस्थेनेच विकसित देशांना व जागतिक बँकेसारख्या अर्थव्यवस्थांना आपली पाळमुळं भारतात पसरवायला मुभा दिली. यातुन शिक्षण क्षेत्रही सुटले नाही. याचे गंभीर परिणाम आज शिक्षणक्षेत्रावर झालेले दिसून येत आहेत.

**१) शिक्षणाच्या मूळ उद्देशाकडे दुर्लक्ष -**आपल्या देशाच्या घटनेने शिक्षण देण्याची जबाबदारी सरकारकडे सोपविली आहे. १४ वर्षाखालील मुलामुलींना सक्तीचे व मोफत शिक्षण देणे ही सरकारची जबाबदारी राहील असे सरकारचे उद्दिष्ट आहे. सक्षम समाजउभारणी, ज्ञान, आर्थिक विकास ही या धोरणामागची उद्दिष्टये होती. जागतिकरणाच्या प्रक्रियेमुळे शाळा या गोष्टीची व्याख्या बदलून सरकार पर्यायी "अनौपचारिक शिक्षण केंद्र" अशी करु पाहत आहे. विद्यार्थ्यांना विचार करायला प्रवृत्त करणे, त्यांच्यात संवेदन क्षमता आणि माणूसपणाचा विचार रुजविण्याचा प्रयत्न आजच्या शिक्षणव्यवस्थेत होताना दिसत नाही. तसेच त्यांच्यात कौशल्यवृध्दी व्हावी यासाठीही जाणिवपूर्वक प्रयत्न होत नाहीत. प्रत्यक्ष हाताने काम करण्याच्या अनुभूतीशिवाय ज्ञानाची समज पक्की होणार नाही. परंतु हा विषय आज अभ्यासक्रमात नाही. विद्यार्थ्यांना संपूर्ण आकलनाऐवजी स्मरणशक्तीला महत्वाचे स्थान दिले आहे. यामध्ये त्यांच्या आकलनाची इतर अंगे समग्रविचार, तर्कसंगती, विश्लेषण, परस्परसंबंध जोडणे यांना पूर्णपणे फाटा दिला आहे. प्रचलित परीक्षा पध्दतीने तर शिक्षणाच्या बाजारीकरणाच्या प्रक्रियेला आणखीनच बळकटी आणली आहे. मूल्यमापन पध्दती आधीच ठरलेली असल्यामुळे मुलांना काय शिकविले जाणार, काय प्रश्न विचारले जातील याचा साचा अगदी बालवाडीपासूनच पक्का होऊ लागला आहे. बोर्डाच्या परीक्षांना असलेल्या महत्वामुळे कुठलीही शाळा शिक्षणात नवनवीन प्रयोग करण्याचे धाडस करु शकत नाही.

**२) ज्ञान व समाजधारणा यात तफावत -** जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत शिक्षणाचे बाजारीकरण झाले आहे, यात बाजारव्यवस्था मजबुत करण्याचे साधन म्हणून मुलांकडे पाहिले जाते. त्यावरुनच त्यांची किंमत ठरविली जाते. सुसंस्कृत मानवी समाज निर्माण व्हावा असा समग्र दृष्टीकोन नाकारला जात आहे. जागतिकीकरणाला आवश्यक तेवढेच शिक्षण महत्त्वाचे मानल्याने समाजाच्या गरजा बाजुला सारल्या जातात आणि जागतिक बाजारव्यवस्थेत ज्याला किंमत आहे अशाच शिक्षणक्रमांना व संशोधनाला आर्थिक मदत मिळू शकते. शिक्षणाच्या शाखा, उपशाखा अगदी कंपन्यासुध्दा ज्यांना बाजारमूल्य नाही त्या टिकून राहणं अवघड आहे. उदा. मानवविद्या, इतिहास, समाजशास्त्र इ.

**३) सामाजिक सांस्कृतिक विविधता नष्ट झाली.** जागतिकीकरणाला सामाजिक सांस्कृतिक विविधता सोयीची नाही. विविध ठिकाणी विविध प्रकारची रहाणी खाणेपिणे, सौदर्य कल्पना असतील तर त्या त्या ठिकाणी स्थानिक पातळीवरच उत्पादन बाजारात असेल ते सर्व नष्ट करुन सर्वानी एकाच प्रकारचे खाणपिणं घ्याव म्हणजे पैसा एकत्रितपणे ओढून घेता येतो. मात्र दुस-या बाजूला धर्म, जाती, भाषा, लिंग या गोष्टी तशाच रहाव्यात याकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले आहे. विषमतेची उतरंड आबाधित राहणं बाजारव्यवस्थेला सोईची आहे. उदा. स्त्रियांचा जाहिरातीतील वापर, इंग्रजीतून ज्ञानाचा प्रसार ठराविक आर्थिक गटांना मागास ठेवण्यास उपयोगी ठरतो

**४) वंचितांना शिक्षणाच्या फायदयापासून दूर ठेवणे** विविध सामाजिक कारणामुळे विकासाच्या वाटेवर मागे राहिलेल्या सर्व मुलामुलींना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी अनेक योजना मांडल्या जाऊनही राजकीय इच्छाशक्तीच्या अभावी त्या प्रत्यक्षात येऊ शकल्या नाहीत. गेल्या पन्नास वर्षात सरकारी शाळामध्ये संख्यात्मक वाढ झाली असली तरी दर्जा मात्र घसरला आहे. खाजगी शाळा वाढल्या, सरकारी शाळा बंद पडू लागल्या. खाजगी शाळा परवडू न शकणा-या मुलांसाठी काहीच पर्याय नाही. त्यामुळे जागतिक बँक व इतर वित्तसंस्था यांना शिरकाव करायला संधी मिळाली. यामुळे कर्जाच्या मोबदल्यात शिक्षण खर्चात कपात करणा-या अनेक योजनांचा आग्रह धरण्यात येऊ लागला. शाळेबाहेर राहिलेल्या मुलांसाठी अनौपचारिक केंद्राचा पर्याय पुढे येऊ लागला आहे. त्यामुळे पंचतारांकित खाजगी शाळापासून ते कमी पैशात चालणा-या वस्तीशाळांपर्यंत त्या त्या आर्थिक गटांच्या मुलांसाठी त्या त्या दर्जाच्या शाळा अशी विषम व्यवस्था उभी राहिली आहे. समान अभ्यासक्रम समान परीक्षा असुनही शिक्षणातील दर्जात तफावत असलयामुळे कमी आर्थिक गटातील मुले १० वी पर्यंत पोहोचणे देखिल अशक्य झाले आहे. याशिवाय उच्च शिक्षणावरील खर्च कमी करुन शालेय शिक्षणाकडे वळवावा असे जामतीन परिषदेत ठरले आहे. त्यामुळे उच्च व तंत्रशिक्षणाचे व्यापारीकरण झाले आहे. त्यामुळे कनिष्ठ मध्यमवर्ग व वंचित गटातील लोकांना शिक्षणाच्या प्रक्रियेपासून दूर ठेवले जाईल. उच्चवर्गीयांच्या हातात ज्ञानाचे फायदे राहतील व संपूर्ण शिक्षणव्यवस्थेचा कल भोगवादाकडे राहिल.

**५) पॅरा शिक्षकांचा शोध -** जागतिकीकरणामुळे शिक्षणक्षेत्रात पॅरा-शिक्षक नावाची नवीन प्रजाती निर्माण झाली आहे. वेगवेगळया राज्यात वेगवेगळया नावानी ओळखल्या जाणा-या या प्रजातीचा शोध कल्याणकारी योजनावरचा खर्च कमी करण्यासाठीच आहे. भारतातील सरकारी शिक्षणाला स्थायी स्वरुपाचा, प्रशिक्षित योग्य वेतनश्रेणी असलेल्या शिक्षकांपासून वंचित करुन खाजगी शिक्षणाला बाजारात अनुकूल शिक्षकवर्ग निर्माण करणे हे जागतिकीकरणाचे उद्दिष्ट आहे. जागतिक बँकेच्या कर्जावर चालणारे शिक्षण जसजसे पुढे जाईल तसतसे देशातील बालकांना सुयोग्य शिक्षण देण्याचे उद्दिष्ट दूरदूर जाईल. या अभिनयातून एक शिक्षकी शाळांसारख्या नवनवीन चमत्कारीक कल्पना पुढे आल्या आहेत. या शाळेत एक शिक्षक एक ते चार इयत्तांना शिकवेल. अशाप्रकारचे प्रशिक्षणही त्यांना देण्यात आले आहे. भारतासारख्या गरीब देशांत एका इयत्तेसाठी एक शिक्षक मिळू नये यासाठी केलेल्या युक्तीचे हे गोंडस नांव आहे.

**६) नव्या शैक्षणिक धोरणाचे परिणाम -** जागतिकीकरणाच्या आणि व्यापारीकरणाच्या युगांत शिक्षण ही एक विकावू वस्तू अगर सेवा बनली आहे. या पार्श्वभूमीवर आपल्या देशात २००२ मध्ये अंबांनी - बिर्ला या कार्पोरेट मंडळींनी एका अहवालाव्दारे शिक्षणव्यवस्थेच्या खाजगीकरणाच्या धोरणाचा पाठपुरावा केला आहे. या मंडळींनी गुणवत्ता हाच निकष ठरवून शिक्षण धोरणांत आमुलाग्र बदल सुचविले आहेत. मोफत व सक्तीचे शिक्षण २००४ च्या मसुद्यात प्राथमिक व माध्यमिक शिक्षणात पुढील त्रुटी आढळतात.

i) भारतीय घटनेने मांडलेल्या समानता आणि समाजातील सर्व घटकांना विकासासाठी देऊ केलेली संधी या मसुद्यात नाकारली आहे.

ii) १९८६ च्या घटनादुरुस्ती कायदयाने शासन प्राथमिक शिक्षणासाठी लागणा-या आर्थिक जबाबदारीतून मुक्त होणार आहे.

iii) गुणवत्ता हाच निकष ठरवितांना सामाजिक न्याय आणि समान शिक्षण पध्दती या समाजातील सर्व घटकां-साठीच्या शिक्षणपध्दतीपासून शासन अलिप्त होत आहे.

iv) ६ ते १४ वयोगटातील मुलांना सक्तीचे शिक्षण करतांना ४ ते ६ या शिशुगटातील बालकांना शिक्षणापासून वंचित ठेवले आहे.

v) सक्तीच्या शिक्षणातील सरकारने आपली वैधानिक व आर्थिक मुक्तता करुन घेतली आहे. ग्रामीण ० दुर्बल घटकांतील मुलांच्या शिक्षणातील जबाबदारी सरकारने नाकारली आहे व एक शिक्षकी शाळा सुचविल्या आहेत.

vi) अपंग व मतिमंद मुलांकडे दुर्लक्ष केले आहे.

vii) बालकामगारांसाठी वेगळी शिक्षणपध्दत सुचवितांना समान शिक्षणपध्दतीकडे दुर्लक्ष केले आहे.

viii) शिक्षण ही विकावू वस्तू अगर सेवा या विचाराला कायदेशीर मान्यता देतांना या संदर्भात निर्माण होणा-या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक बाबींचा विचार केलेला नाही.

**७) शिक्षणातील खाजगी-सरकारी भागीदारी** अकराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये खाजगी सरकारी भागीदारीमध्ये शिक्षण देण्याचे मॉडेल आणले आहे. म्हणजेच जनतेचा पैसा वापरुन शिक्षणाचे खाजगीकरण व्यापारीकरण करण्याचा हा मार्ग आहे. यामध्ये माध्यमिक शिक्षण देण्यासाठी CBSC अभ्यासक्रम शिकविणा-या ६००० नवीन मॉडेल शाळा सुरु करावयाच्या असून त्यातील २५०० शाळा भागीदारीमधल्या असतील. मागासलेल्या दुर्गम भागात शाळा काढून गुणवत्तापूर्वक शिक्षणाची सोय करण्यात येईल. या आराखडयानुसार २०१४ साली या शाळा सुरु होतील. या शाळेत ६५ लाख विद्यार्थी शिकतील त्यातील २५ लाख वंचित समाजातील असतील. प्रत्येक शाळेत २५०० पैकी १००० विद्यार्थी वंचित गटातील असतील. हजारातील अर्धे SC, ST व OBC वर्गातील असतील त्यांना महिना २५ रु. एवढी फी असेल व वंचित गटातील उरलेल्यांना ५० रु. फी असेल. ही कुटुंबे आयकर न भरणारी असतील.किमान २५ लाखाची किंमत असलेल्या कोणत्याही कंपनीला अशी शाळा सुरु करता येईल. त्यासाठी कंपनीने सरकारकडे ५० लाख डिपॉझिट ठेवावे. पहिल्या शाळेसाठी ५० लाख तर पुढच्या

प्रत्येक शाळेसाठी २५ लाख डिपॉझिट भरावे लागेल. कोणतीही कंपनी २५ शाळा सुरु करु शकेल. जर ना नफा कंपनी असेल व आधीचा शाळा चालविण्याचा कंपनीला अनुभव असेल तर २५ लाख डिपॉझिट भरावे लागेल. मात्र चांगल्या खाजगी शाळांसाठी इमारत, मैदान, प्रयोगशाळा इ. सोई असाव्या लागतील. यामध्ये वंचित गटातील मुलांच्या फी च्या रुपाने सरकारकडून प्रचंड मोठा खजिना खाजगी शाळांकडे पाठविला जाणार आहे. अशा शाळांना नफ्याचे अमर्याद स्वातंत्र्य आहे. अशा शाळांवर सरकारचा ताबा नाही. फक्त वंचित घटकांतील १००० विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची एकमेव अट त्यांच्यावर राहिल. याचा परिणाम असा होणार आहे की, शिक्षणात नफा कमवू नये असे असतानाही नफ्याला उत्तेजन मिळणार आहे. हे एकप्रकारचे खाजगीकरण किंवा व्यापारीकरण आहे यासाठी जनतेचाच पैसा वापरला जाणार आहे.

**८) केंद्रीय सर्वोच्च संस्थांचे खच्चीकरण -** केंद्रसरकारचे नवीन शैक्षणिक धोरण फारच भयानक आहे. यु.जी.सी., ए.आय.सी.टी.ई., आय.एम.सी. ,एन.सी.टी.ई. इ. भारतातील सर्वोच्च केंद्रीय शिक्षण संस्था आज शिक्षणातील विविध क्षेत्रात महत्त्वाची भूमिका पार पाडत आहेत. वरील सर्व संस्थांच्या जागी एकच सर्वोच्च केंद्रीय संस्था म्हणून राष्ट्रीय उच्च शिक्षण व संशोधन आयोग (एन.सी.एच.ई.आर) आणण्याचे धोरण अवलंबिले जात आहे. हे धोरण फारच घाईगडबडीने व भविष्यातील परिणामांची चिंता न करता विचारशून्य पध्दतीने आखले आहे की भविष्यात शिक्षणामध्ये या मूठभर लोकांची सत्ता राहिल. सध्याच्या सर्वोच्च संस्थांमधील काही अधिकारी भ्रष्ट असल्याने मानव संसाधन मंत्र्यांनी घाईगडबडीने निर्णय घेण्याचे ठरविले आहे.

**९) परदेशी विद्यापीठांना भारतात मुक्त प्रवेश -** २००५ साली भारताच्या संसदेने खाजगी विद्यापीठाचा कायदा मंजूर केला. या बिलांने भारतात विदेशी विद्यापीठांना प्रवेश करणे शक्य झाले. यामुळे विदेशी विद्यापीठांना फीरचना, प्रवेश प्रक्रिया ठरविण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असेल. मागासलेल्यांना कोणतेही आरक्षण नसेल. जर खाजगी व विदेशी विद्यापीठांना भारतीय शिक्षण क्षेत्रात मुक्त कार्यप्रणाली राबवायला मुभा दिली तर शिक्षण ही एकप्रकारची क्रमवस्तू बनून विविध पदवी व पदविका प्रमाणपत्रांना किमतीचे लेबल लावावे लागेल. त्यामुळे शिक्षणाचे कंपनीकरण, व्यापारीकरण होऊन राष्ट्र उभारणीसाठी उच्च शिक्षण हा उद्देशच बाजूला पडेल.भारतामध्ये शिक्षणव्यवस्थेत येणा-या या विदेशी विद्यापीठांना कोणीच हरकत घेऊ शकणार नाहीत. ही खाजगी व विदेशी विद्यापीठे भारतातील गर्भश्रीमंतांनाच आपल्या पदव्या देतील. त्यामुळे मोठया पगाराच्या नोक-या श्रीमंतांनाच मिळतील. गरीब व मध्यमवर्गीय यापासून वंचित राहतील.

**निष्कर्ष -**स्वातंत्र्यानंतर समाजाच्या विकासाला महत्त्व देणारी, राष्ट्रउभारणीसाठी आवश्यक असणारी राष्ट्रप्रेमी पिढी निर्माण करण्यासाठी आवश्यक असणारी शिक्षणपध्दती आपण स्वीकारली होती. स्वतंत्र भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना आझाद यांनी शिक्षण हे लोकशाही निधर्मीपणा व राष्ट्रीय जडणघडणीसाठी लागणारे प्रभावी साधन आहे असे स्पष्ट केले होते. तर १९६४ साली स्थापन झालेल्या कोठारी आयोगाने शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट करताना म्हटले आहे की या देशाचे भविष्य शाळांच्या वर्गात ठरणार आहे. आपल्या शाळा आणि महाविद्यालयातून बाहेर पडणा-या विद्यार्थ्यांच्या संख्येवर आणि गुणवत्तेवर देशाची जडणघडण सर्वसामान्यांचे जीवनमान उंचावणे अवलंबून आहे. राष्ट्रीय आणि सामाजिक एकतेसाठी शिक्षण हाच पाया आहे. देशात अशा क्रांतीकारी शिक्षणाची गरज आहे की जे अतिशय महत्वाच्या पण दुर्लक्षित अशा सामाजिक शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्याला गती देईल. याच दिशेने शिक्षणाची दिशा सुरु होती. परंतु आता १९९० नंतर भारतात सुरु झालेल्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचे गंभीर परिणाम प्रत्ययाला येऊ लागले आहेत. या प्रक्रियेने शिक्षणाचे बाजारीकरण झ ाले आहे. शिक्षण ही बाजारातील विकाऊ वस्तू अगर सेवा झाली आहे.अंबानी-बिर्ला अहवालाने शिक्षणाच्या खाजगीकरणाच्या धोरणाचे समर्थन करुन व 'गुणवत्ता' हाच निकष ठरवून शैक्षणिक धोरणात आमुलाग्र बदल सूचविले आहेत. या धोरणाचा सर्वात मोठा फटका ग्रामीण भागातील तसेच आर्थिकदृष्टया दुर्बल व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना बसणार आहे. अकराव्या पंचवार्षिक योजनेत खाजगी-सरकारी भागीदारीत शिक्षण देण्याचे मॉडेल मांडले असून त्यावर समाजाचा आणि सरकारचा काहीच ताबा असणार नाही. जनतेचा पैसा वापरुन शिक्षणाचे खाजगीकरण व व्यापारीकरण करण्याचा हा डाव दिसतो.महाराष्ट्र सरकारने २०११ मध्ये खाजगी विद्यापीठ बील संमत करुन परदेशी विद्यापीठांना भारतात प्रवेश करण्याची संधी दिली आहे. या विद्यापीठात राखीव जागा ठेवण्याची तरतूद नाही. फी आकारण्यावर कोणाचेच नियंत्रण नाही. खाजगी शाळांचा प्रभाव वाढत असून सरकारी शाळांमधील विद्यार्थी संख्या कमी-कमी होत आहे. २००६-०७ व २००७-०८ या एका वर्षात सरकारी शाळातील विद्यार्थी संख्येत दीड लाखाची घट झाली आहे. तर खाजगी शाळांमध्ये जाणा-या विद्यार्थ्यांना साडेपाच लाखांनी वाढ झाली आहे.

आज जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने भारतीय शिक्षण व्यवस्थेमध्ये पाच तथाकथीत तत्वानी धुडघुस घातला आहे. त्यामध्ये

१) कायम विनाअनुदानित तत्व
२) खाजगी-सार्वजनिक भागीदारी
३) फी देण्याची पात्रता
४) अनुदान कमी करण्याचे तत्व आणि
५) बाजारु शिक्षणपध्दती या तत्त्वामुळेच शिक्षणव्यवस्थाच पोखरली गेली आहे.

या सर्व परिस्थितीचे कारण म्हणजे या जागतिकरणाच्या प्रक्रियेत शिक्षणपध्दतीमध्ये निश्चित असा विचार नाही. जी व्यवस्था परस्पर बनत आहे तिलाच आपण आपली व्यवस्था मानतो. अभ्यासक्रमाबाबतही गोंधळ आहे. त्यामुळे महागडया कोचिंग क्लासेसचे पीक वाढत आहे. या सर्व स्थितीमुळे विद्यार्थी परीक्षार्थी बनतात व शिक्षण ही विक्रीची वस्तू व खरीदण्याची वस्तू बनली आहे.

**संदर्भ :-**

१) नीरज जैन - जागतिकीकरण की नवी गुलामगिरी लोकायत प्रकाशन
२) कॉ. गोविंद पानसरे - व्दिवर्ण शिक्षणव्यवस्था भारतीय कम्युनिष्ट पक्ष
३) आंदोलन शाश्वत विकासासाठी - अंक जाने./फेब्रु. २०१२
४) भाई वैद्य - संपूर्ण शिक्षण, समाजवादी अद्यापक सभा
५) प्रबोधन प्रकाशन ज्योती - दीपावली विशेषांक - ऑक्टो. २००७